# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 06.02.2026** **वार- शुक्रवार**

---

**निवडणूक**

पुणे जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांची निवडणुकीसाठी उद्या मतदान होणार आहे. जिल्हा परिषदेचे ७३ गट आणि पंचायत समितीच्या १४६ गणांसाठी उद्या सकाळी साडेसात ते संध्याकाळी साडेपाच या वेळेत मतदान होणार आहे. यासाठी प्रशासकीय यंत्रणा सज्ज असून पात्र मतदारांनी उत्स्फूर्तपणे मतदान करावं असं आवाहन जिल्हा निवडणूक अधिकारी जितेंद्र डूडी यांनी केलं आहे.

**केंद्र**

मुंबईचं भाभा अणु संशोधन केंद्र आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्यादरम्यान बार्क स्पिन-ऑफ

तंत्रज्ञानाच्या प्रचार आणि प्रसारासाठी ‘आकृती केंद्र’ स्थापन करण्याबाबत सामंजस्य करार नुकताच करण्यात आला. 2009 पासून राबवण्यात येणारा प्रगत ज्ञान आणि ग्रामीण तंत्रज्ञान अंमलबजावणी,  म्हणजे आकृती कार्यक्रम शहरी आणि ग्रामीण भागातील तंत्रज्ञानातील दरी कमी करण्याच्या उद्देशानं कार्यरत आहे. नवोपक्रम, उद्योजकता तसंच व्यवसाय आणि तंत्रज्ञानाला चालना देणं हे या उपक्रमाचं प्रमुख उद्दिष्ट आहे.

**रेल्वेसेवा**

केंद्र सरकारनं पुणे-दिल्ली दरम्यान राजधानी एक्स्प्रेस, वंदे भारत शयन किंवा तेजस एक्स्प्रेस यासारखी रेल्वे सेवा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी राज्यसभा खासदार प्राध्यापक डॉक्टर मेधा कुलकर्णी यांनी आज राज्यसभेतील शून्य प्रहरात केली. पुणे शहर देशातील प्रमुख शिक्षण, संशोधन, आयटी, स्टार्ट-अप आणि औद्योगिक केंद्र म्हणून विकसित झालं आहे. देशभरातून हजारो विद्यार्थी, आयटी व्यावसायिक, उद्योजक, संरक्षण आणि स्वयंचलित उद्योगाशी संबंधित तज्ज्ञ, तसेच सरकारी अधिकारी आणि लोकप्रतिनिधी पुणे-दिल्लीदरम्यान नियमित प्रवास करतात. मात्र सध्या या मार्गावरील रेल्वे प्रवासासाठी २० ते ३० तासांचा कालावधी लागतो. अनेक गाड्यांमध्ये वेळेची अनिश्चितता, प्रचंड गर्दी आणि मर्यादित सुविधा असल्यानं प्रवाशांना मोठ्या अडचणींना सामोरं जावं लागत आहे याकडे कुलकर्णी यांनी लक्ष वेधलं.

**जल**

देशातील बहुतांश जलसंरचना, विशेषतः धरणं जुनी होत चालली आहेत; त्यामुळं संभाव्य धोके टाळण्यासाठी त्यांचं वेळेवर 'जोखीम मूल्यांकन' करणं ही आजच्या काळाची मोठी गरज आहे, असं मत केंद्रीय जल आणि ऊर्जा संशोधन केंद्राचे संचालक डॉ. आर. एस. कडू यांनी पुण्यात व्यक्त केलं.

केंद्रीय जल आणि ऊर्जा संशोधन केंद्राद्वारे आयोजित जलसंरचनांचे जोखीम मूल्यांकन, देखरेख आणि पुनर्वसन या विषयावरच्या सर्वसमावेशक ऑनलाइन तांत्रिक प्रशिक्षण कार्यक्रमाचं उद्घाटन करताना ते काल बोलत होते. केवळ पारंपरिक पद्धतींवर अवलंबून न राहता, उपग्रह प्रतिमा आणि वास्तविक वेळेत संनियंत्रण यांसारख्या आधुनिक देखरेख तंत्रज्ञानाचा वापर करून संभाव्य धोके आधीच ओळखले पाहिजेत असं त्यांनी नमूद केलं.

**<u>महापौर</u>**

पिंपरी चिंचवड शहराच्या महापौरपदाची सूत्रं भारतीय जनता पक्षाचे नगरसेवक रवी लांडगे यांनी तर शर्मिला बाबर यांनी उपमहापौरपदाची सूत्रं आज स्वीकारली.

**<u>कर्करोग</u>**

नुकत्याच झालेल्या जागतिक कर्करोग दिनाच्या निमित्तानं आज पुण्यात आदित्य बिर्ला स्मृती रुग्णालयाच्या वतीनं जनजागृतीसाठी बाईक फेरी काढण्यात आली. यामध्ये दीडशे डॉक्टरांनी सहभाग घेतला. कर्करोग उपचारापूर्वीची जागरूकता, प्रतिबंधात्मक तपासणी, आधुनिक उपचार पद्धतींची माहिती यावेळी नागरिकांना देण्यात आली.

**<u>पुनर्वसन</u>**

नवनिर्वाचित नगरसेविका मृणाल कांबळे यांच्या संकल्पनेतून  झोपडीधारकांना पक्की घरं देण्याच्या उद्देशातून आज लोहियानगर पुनर्वसन प्रकल्पाचा भूमीपूजन समारंभ पार पडला.  त्यावेळी आमदार सुनील कांबळे, आणि हेमंत रासने उपस्थित होते.

**<u>निवड</u>**

45 व्या राष्ट्रीय मास्टर्स अथलेटिक्स चॅम्पियनशिप स्पर्धेसाठी पुणे जिल्हा मास्टर्स अथलेटिक्स संघटनेच्या 23 खेळाडूंची निवड करण्यात आली आहे. पुरुष संघाच्या कर्णधारपदी रोहित तावडे.तर महिला संघाच्या कर्णधारपदी रेखा होशिंग असणार आहेत.

ही स्पर्धा 13 ते 15 फेब्रुवारी दरम्यान मध्यप्रदेशात जबलपूर इथं होणार आहे.

**<u>सत्कार</u>**

यंदाच्या पद्मश्री पुरस्काराचे मानकरी कृषी तंत्रज्ञान संशोधक श्रीरंग लाड, तारपा वादक भिकल्या लाडक्या धिंडा, लोकनाट्य आणि तमाशा कलावंत रघुवीर खेडकर यांचा विशेष सन्मान सोहळा विदिशा विचार मंच आणि कोहिनूर कट्टा यांच्याद्वारे उद्या पुण्यात आयोजित करण्यात आला आहे. हा कार्यक्रम सर्वांसाठी विनामुल्य खुला आहे .

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**